**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र १ यांचा उलटतपास प्र.वादी १ तर्फे एस.एस.मुजावर वकीलांचे तर्फे उलटतपास सुरु</u>**

मी प्रस्तुत जबाब वादी क्र १अ ते १इ करीता देत नाही. हे खरे नाही की दावा मिळकतीचे आम्ही मालक आहे म्हणून कोणताही कागद हजर केलेला नाही. त्याबाबत कागद मी दाखवु शकतो. नि ७० वरील सात बारा उतारा सर्व्हे नं. ४८४/२ मध्ये रामा जाकाप्पा कुरणे याच्या नांवे ०.२१ आर क्षेत्राची नोंद सन २०११ पासुन आहे. हे खरे आहे की नि.७० वरी सर्व्हे नं. ४८४/२ मध्ये नमुद रामा जकाप्पा कुरणे यांचे वारसांची सदर ०.२१ आर क्षेत्रावर स्वतंत्र मालकी वहीवाट आहे. रामा कुरणे यांनी रे.क.नं. १२८/१९९१ चा वाटपाचा दावा दाखल केल्याचे मला आठवित नाही. नि. ७७ प्रमाणे रामा कुरणे याला रे.क.नं. १२८/१९९१ मधील हुकूमनाम्याप्रमाणे न्यायालयीन वाटपाव्दारे ०.२१ आर क्षेत्र स्वतंत्र देण्यात आले आहे. हे खरे आहे की नि. ७७ प्रमाणे मो.र.नं. ६३/२००२ प्रमाणे सदर ०.२१ आर क्षेत्र रामा कुरणेला स्वतंत्र नकाशामध्ये दर्शविलेप्रमाणे दिले आहे. हे खरे आहे की रे.क.नं. १२८/१९९१ विरुध्द आज अखेर आम्ही दाद मागीतलेली नाही. हे खरे नाही की १२८/१९९१ मधील हुकूमनाम्या विरुध्द आमची तक्रार नाही.

हे खरे आहे की रामा कुरणे हे त्यांच्या सदर ०.२१ आर क्षेत्रातील ऊस जवाहर सहकारी साखर करखान्यास पाठवितात. हे खरे आहे की सदर ०.२१ आर क्षेत्रात रामाच्या पश्चात त्याचे वारस शांततामय कब्जे वहिवाट करतात. सर्व्हे नं. ४८४/२ बाबत मी तहसिलदार यांचेकडे तक्रार दाखल केली होती ती नामंजुर झाली आहे. अपिल क्र १७६/२०१८ हे प्रांत अधिकारी यांनी नामंजुर केले आहे. अपिल क्र १७६/२०१८ मधील निर्णयाविरुध्द अपील चालु आहे परंतु त्यामध्ये स्थगिती आदेश नाही. हे खरे नाही की रे.क.नं. १२८/१९९१ प्रमाणे रामा जकाप्पा कुरणे याला मिळालेल्या ०.२१ आर क्षेत्राबाबत तक्रार नाही. हे खरे आहे की प्र.वादी क्र. २ ते ५ यांनी आम्हाला हरकत अडथळा केला असुन त्याव्यतिरीक्त अन्य कोणी हरकत अडथळा केलेला नाही. हे खरे नाही की रामा व त्यांच्या वारसांना त्रास द्यावा म्हणुन प्रस्तुत खोटा दावा दाखल केलेला आहे. रामा कुरणे यांनी रे.क.नं. २८६/२००४ चा केवळ मनाई हुकूमाचा दावा दाखल केला होता व तो मंजुर झाल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की प्र.वादी १

विरुध्द खोटी साक्ष देत आहे.

प्र.वादी २अ, २ब, ३ ते ५ पुकारता गैरहजर व कोणताही अर्ज नाही करीता त्यांचे विरुध्द उलटतपास नाही आदेश पारीत करणेत येतो.

**फेरतपास नाही**

**उलटतपास पुर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/-

**(डॉ.डी.जी.पटवे )**

दिनांक – २७/०९/२०२३ **सह.दि.न्या.क.स्तर,इचलकरंजी.**